**Publication: Sanj Samachar**

**Date: Sunday, 8th June, 2014**

**Edition: Pune**

# इंडियाफर्स्ट लाईफच्या विकास योजनेला सुरूवात

मुंबई. देशातील सर्वात तरूण जीवन विमा कंपनी इंडियाफर्स्ट लाईफने आपल्या दीर्घकालीन विकास धोरणाचा भाग म्हणून राज्यातील आपली उपस्थिती वाढवण्यासाठी योजनांची घोषणा केली. आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये वर्षागणिक 20 टक्के विकासाचे ध्येय कंपनीने राखले आहे. औद्योगिक केंद्र समजले जाऊनसुद्धा आजही महाराष्ट्रातील मोठी लोकसंख्या कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. अशा ह्या संमिश्र परिस्थितीमुळे आम्हांला आव्हानात्मक संधी उपलब्ध होतात. असे इंडियाफर्स्ट लाईफच्या विक्री विभागाचे संचालक कमलाकर साई म्हणाले कंपनीने आत्तापर्यंत 9.42 लाख ग्राहकांना विम्याचे कवच प्रदान केले असून सुरूवातीपासून सुमारे 881 करोड रूपयांचा व्यवसाय महाराष्ट्रातून प्राप्त केला आहे.

A Joint Venture of
Bank of Baroda Legal & General Andhra Bank